डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती वर्षानिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक ,वाटेगाव ,ता. वाळवा जि. सांगली या इमारतीच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: सान्यावि -२०१७/ प्र.क्र.३६९/ बांधकामे
मंत्रालय, विस्तार इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ जानेवारी, २०१८.

वाचा :-
१) शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सान्यावि-२०१५/ प्र.क्र.१६३/बांधकामे, दि.९/१०/२०१५
२) शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग बैठक-२०१६/ प्र.क्र.४७५/ बांधकामे, दि.२४/३/२०१७
३) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/मावक/ वाटेगाव /ऐति.स्थळ/ २०१७-१८/का.१२/१३०३, दि.०४/०९/२०१७.

प्रस्तावना :-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे या अंतर्गत संदर्भ क्र.१ अन्वये मा.मंत्री (सा.न्या.वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.१/८/२०१६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तासोबतच्या परिशिष्ट- अ मध्ये अनुसूचित जाती नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्व असलेल्या एकूण २८ ठिकाणे/स्थळांची यादी अंतिम करण्यात आली असून त्यामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक ,वाटेगाव ,ता. वाळवा जि. सांगली इत्यादीकरिता रु.५० लाख निधी मंजूरी बाबत संदर्भीय क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. ३ अन्वये आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक ,वाटेगाव ,ता. वाळवा जि. सांगली इत्यादीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर कामाच्या परिगणित करण्यात आलेल्या रु . ५०,६३,९५६/- (रुपये पन्नास लाख त्रेसष्ट हजार नऊशे छपन्न फक्त) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या दि. ०४/०९/२०१७ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक ,वाटेगाव ,ता. वाळवा जि. सांगली इत्यादीकरिता रु. ५०,६३,९५६/- (रुपये पन्नास लाख त्रेसष्ट हजार नऊशे छपन्न फक्त) इतक्या खर्चास पुढील अटींच्या अधिन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर कामाचा खर्च सन २०१६-१७ च्या उपलब्ध अनुदानातून भागवावा.

२) सदर अंदाजपत्रक अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सांगली यांचेकडून साक्षांकित करण्यात यावे.

२. प्रस्तुत खर्च हा मागणी क्र.एन-३, २२५-अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, ७८९- अनुसूचित जाती घटक योजना, ०२- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे (योजनातर्गत-दत्तमत्त) लेखाशिर्ष २२२५ डी ८२३ या लेखाशिर्षाखाली सन २०१६-१७ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांच्या अधिनस्थ असलेल्या निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

३. या करीता आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांनी या कामासाठीचा निधी, वित्त विभागाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार त्या त्या टप्प्यावर सदरहू कामाकरीता वितरीत करावा.

४. प्रस्तुतचा शासन निर्णय, दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीस प्राप्त अधिकार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१२४११३४४९९०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.01.24 11:40:15 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे.
४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे.
५. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सांगली .
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सांगली.
७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर.
९. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे .
१०. सहायक आयुक्त, समाजकल्याण, सांगली.

११. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ सांगली .
१२. सरपंच ,ग्रामपंचायत वाटेगाव ,ता .वाळवा ,जि.सांगली
१३. मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१४. मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती / बांधकामे.